**<u>पेडणे भागात पूरवठा सुरळित करण्यासाठी वीज खात्याचे प्रयत्न</u>**

ता. 06 ऑगस्ट 2019
15 श्रावण 1941

3 ते 6 ऑगस्टपर्यंत मुसळधार पाऊस आणि वादळी वाऱ्यामुळे पेडणे, थिवी आणि अंजुणा, आसगांव, सोडयें, शिवोली, मयडे आणि नास्नोडा ग्रामपंचायत भागात वीज पूरवठ्यात अडथळा निर्माण झाला तसेच अंजुणा, आसगांव, कोलवाळे, कामुर्ली, रेवोडा, नादोडा, पिर्णा, मयडे, शिवोली, मांद्रे, मोरजी, आरांबोल, नागझर, वारखंड, हळी-चांदेल, धारगळ या ग्रामपंचायत भागात 3 ते 6 ऑगस्टपर्यंत झाडे पडल्याने, इंन्सुलेटर खराब झाल्यामुळे वीज पूरठ्यात अडथळा निर्माण झाला. मुसळधार पावसामुळे वीज पूरवठा करण्यास विलंब झाला. धारबांदोडा, कामुर्ली, हळी चांदेल, नानाचीपाणी-वारखंड, वाळपे, आरोबा, धारगळ, सोडयें शिवोली येथे पाणी भरल्याने रस्ता ब्लॉक होण्याच्या घटना घडल्या त्यामुळे सभोवतालच्या भागात वीज पुरवठा सुरळित करण्यास विलंब झाला. झाडे पडल्याने सुमारे 45 आरसीसी वीज खांब आणि 185 वीज वाहिन्या तुटून पडल्या सुरळित वीज पूरवठा करण्यासाठी खाजगी परवानाधारक इलेक्ट्रीकल कंत्राटदाराची उपयोगात आणण्यात येईल.

मा/वाप/एमएस/जॉआ/रना/प्रधु/2019/440

--


DIRECTORATE OF INFORMATION AND PUBLICITY.
THIRD FLOOR,UDYOG BHAVAN,
NEAR AZAD MAIDAN, PANAJI GOA